**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक २३ मार्च २०२४**

**ठळक बातम्या**

1. **अमरावतीची लोकसभेची जागा भाजपा उमेदवार लढविणार तर रामटेक मध्ये शिवसेना शिंदेगटाचा उमेदवार; भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती.**
2. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या 'युवारंग' युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद हिस्लॉप महाविद्यालयाने पटकावले; जी.एस. महाविद्यालय दुसऱ्या क्रमांकावर.**
3. **उद्या होत असलेल्या होलिका दहन आणि सोमवारी साजऱ्याहोत असलेल्या रंगपंचमी निमित्त बाजारपेठा सजल्या.**

   **आणि**
4. **मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी अमरावती जिल्यात महिलांची "द पिंक फोर्स" सज्ज.**

*****

बावनकुळे

अमरावतीची लोकसभेची जागा भाजपा उमेदवार लढविणार हे निश्चित झालं असून, त्यावर लवकरच चर्चेअंती नाव घोषित करण्यात येईल असे भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात माध्यम प्रतिनिधींसोबत बोलताना सांगितले. रामटेक मध्ये शिवसेना शिंदेगटाचा उमेदवार असेल तर गडचिरोलीचा निर्णय देखील लवकरच होणार आहे. महायुतीचे १३ पक्ष मिळून निवडणूक लढविणार असून ५१ टक्के मतं आपल्याला मिळतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. लोकसभेच्या ६-७ जागांविषयी चर्चा सुरु असून लवकरच हा जागावाटपाचा प्रश्न सुटेल. आपला पक्ष बूथ स्तरावर काम करीत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १० वर्षाच्या  कार्यकाळातील योजना, कार्य लोकापर्यंत पोहचविण्यासाठी आम्ही घरोघरी पत्रक देणार आहोत. यामुळे ५-७ टक्क्यांनी मतांमध्ये वाढ होईल असा अंदाज बावनकुळे यांनी बोलून दाखविला. उदयन राजे यांनी सातारा लोकसभा

जागेची मागणी केली आहे. परंतु महायुतीची जी चर्चा होईल त्याप्रमाणे पुढे जाऊ असं देखील त्यांनी सांगितलं.

भाजप केंद्रीय निवडणूक समिती बैठक

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, भाजप लक्षद्वीप इथं लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पाठिंबा देणार आहे. पक्षाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांनी ही माहिती दिली.

इक्बाल सिंग चहल

राज्य सरकारनं काल इक्बाल सिंग चहल यांची मुख्यमंत्र्यांच्या सचिवालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून नियुक्ती केली आहे. भारतीय निवडणूक आयोगानं राज्य सरकारला भूषण गगराणी यांची मुंबई महानगरपालिकेचे नवीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्याचे निर्देश दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. लोकसभा निवडणुकीच्या वेळापत्रकाच्या घोषणेनंतर भारतीय निवडणूक आयोगानं ३ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवा करणाऱ्या नागरी आयुक्त आणि अतिरिक्त किंवा महापालिका आयुक्तांची बदली करण्याचे आदेश दिले होते.

निर्यात बंदी

केंद्र सरकारने कांद्यावरची लावलेली निर्यात बंदी पुन्हा अनिश्चित काळासाठी वाढवली आहे. याबाबतची अधिसूचना काल जारी करण्यात आली. याआधी कांदा निर्यात बंदी ३१ मार्च पर्यंत लागू करण्यात आली होती.

शहीद दिवस

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस शहीद दिवस म्हणून पाळला जातो. या तीन महान क्रांतीकारकांना २३ मार्च १९३१ रोजी फासावर चढवण्यात आलं होतं. यानिमित्त आज विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना अभिवादन करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट संदेशाच्या माध्यमातून या तिघांना आंदरांजली वाहिली असून, देश त्यांच्या हौतात्म्याचं स्मरण करत असल्याचं म्हटलं आहे. अमरावती विद्यापीठात शहिद दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कुलसचिव डॉ.तुषार देशमुख यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून

विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयात देखील शहिद दिन साजरा करण्यात आला.

युवारंग पुरस्कार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित 'युवारंग' या युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद नागपूर येथील हिस्लॉप महाविद्यालयाने पटकावले. जी.एस.महाविद्यालय दुसऱ्या क्रमांकावर राहिले. गोल्डन बॉयचा पुरस्कार सत्यजित तर गोल्डन गर्लचा पुरस्कार कु.इंद्राणी इंदुरकरने पटकाविला. कलेवर प्रेम असणाराच खरा कलावंत ठरतो, असे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.संजय दुधे यांनी युवामहोत्सवाच्या समारोपप्रसंगी काल केले. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने गुरुनानक भवन येथे १९ ते २२ मार्च दरम्यान आयोजित युवा रंगाचा पुरस्कार वितरण समारंभ काल पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना प्रकलगुरु डॉ.संजय दुधे यांनी यशस्वी तसेच पुरस्कार पटकाविणाऱ्या विद्यार्थी व महाविद्यालयांचे अभिनंदन केले.

होळी

उद्या होत असलेल्या होलिका दहन आणि सोमवारी साजऱ्या होत असलेल्या रंगपंचमी निमित्त राज्यातल्या बाजारपेठा सजल्या आहेत. होळीसाठी आलेले रंग, पिचकाऱ्या यांची दुकानं सर्वत्र दिसत आहेत. त्यात रासायनिक रंगांपेक्षा नैसर्गिक रंगांना मागणी असल्याचं दिसून येत आहे. राज्यासह देशाच्या विविध भागात धुळवड मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते. होळी निमित्त नागपूरच्या प्रमुख बाजारपेठांमध्ये विविध रंगांची विक्री करणारी दुकानं सजली आहेत. नैसर्गिक रंग तसंच विविध आकाराच्या आकर्षित करणाऱ्या पिचकारी खरेदी वर ग्राहकांचा अधिक भर असल्याचं विक्रेत्यांनी सांगितलं.

रश्मी शुक्ला

राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी शुक्रवारी गडचिरोली येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील सुरक्षेसंबंधीचा आढावा घेतला. रश्मी शुक्ला यांनी गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राविषयी माहिती घेऊन आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याच्या सूचना केली. शिवाय निवडणुकीदरम्यान नक्षलग्रस्त भागात हिंसक कारवायांना आळा कसा घातला जाईल, यासंदर्भातही माहिती जाणून आवश्यक निर्देश दिले. याप्रसंगी श्रीमती शुक्ला यांनी १९ मार्चला कोलामार्का जंगलात ४ नक्षल्यांना कंठस्नान घालणाऱ्या पोलिसांचा

प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. या बैठकीला अपर पोलिस महासंचालक संजय सक्सेना, प्रवीण साळुंखे, पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

मतदार जनजागृती

लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने अकोला जिल्हा प्रशासनामार्फत जिल्ह्यत विविध उपक्रमांतर्गत मतदारांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीप उपक्रमाच्या नोडल अधिकारी बी.वैष्णवी यांनी शहरातील टॉवर चौकस्थित, जुने बसस्थानक येथे भेट दिली. एसटी बसमध्ये जाऊन त्यांनी प्रवाशांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले. मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्याचे आवाहन करीत त्यांनी मतदार जागृती केली. यावेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, वर्धा जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी कार्यालय हिंगणघाटच्या वतीनं स्वीप अंतर्गत उपविभागीय कार्यालय मतदार नोंदणी अधिकारी, हिंगणघाट व भारत विद्यालय हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली.अमरावती जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे मतदारांमध्ये जनजागृती केली जात आहे. यासाठी विमलाताई देशमुख महाविद्यालयात जिल्ह्यातील प्रत्येक कॉलेजमधील दोन अशा शंभर विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेण्यात आली. या सर्व विद्यार्थ्यांची कॉलेज कॅम्पस अँबेसेडर म्हणून नेमणूक करण्यात आली असून ते महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांच्या मदतीने मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी तसेच मतदारांमध्ये जनजागृती करणार आहेत.

स्वीप स्पर्धा

नागपूर जिल्हयामध्ये होणाऱ्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागांमध्ये मतदारांचे पध्दतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग कार्यक्रम (SVEEP) प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून विशेष पुरस्कारही यासाठी ठेवण्यात आले आहे. रिल मेकींग कॉम्पीटेशन (Reel Making Competition), 18 वर्षावरील पहिल्यांदा मतदान करणाऱ्या युवकांसाठी माझे पहिले मत देशासाठी, मी स्वाभिमानी मतदार, स्पर्धा, अपार्टमेंट/ हाऊसिंग सोसयटीसाठी तीन श्रेणीमध्ये स्पर्धा, औद्योगिक क्षेत्रासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये सर्व गटातील युवा व

इतर मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.विपीन इटनकर व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

द पिंक फोर्स

महिला शक्ती ही कोणत्याही गोष्टीत परिवर्तन घडवून आणू शकते. महिलांनी मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवल्यास जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढेल त्यासाठी सर्व महिलांनी पुढे यावे असे आवाहन अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले. अमरावती जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशासनामार्फत वेगवेगळ्या पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.जिल्हा आणि तालुका पातळीवर मतदान जनजागृती करण्यासाठी मतदार जागृती कक्ष स्थापन करण्यात आले असून गावागावात मतदार जनजागृती करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मोर्शी येथे महिला मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, एएनएम, शिक्षिका आणि बचत गटांची महिला यांचा "द पिंक फोर्स" जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते स्थापन करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते.

******